# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांक : 15.09.2026** **वार : मंगळवार**

---

## ठळक बातम्या

1. गणेशोत्सवाच्या चैतन्य पर्वाला राज्यात उत्साहात सुरुवात.
2. परंपरा आणि पर्यावरणाचा समतोल साधत गणेशोत्सव साजरा करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आवाहन.
3. प्रादेशिक भाषांचा सन्मान राखत हिंदीला संवादाचा दुवा बनवण्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं आवाहन.
4. माजी मंत्री मदन बाफना यांचं पुण्यात निधन.

## सविस्तर बातम्या

**गणेश आगमन**

गणपती बाप्पा मोरयाच्या गजरात, काल राज्यासह देश परदेशात उत्साहात, आणि भक्तिमय वातावरणात गणरायाचं आगमन झालं. घराघरातही लाडक्या गणरायाचं आगमन झालं. पुढचे बारा दिवस चालणाऱ्या या चैतन्य पर्वाला उत्सवाला पारंपरिक पद्धतीनं श्री गणेश प्रतिष्ठापनेनं सुरुवात झाली. मुंबईत सव्वा लाख घरगुती आणि दहा हजार सार्वजनिक गणरायाचं आगमन झालं.

कोल्हापूरच्या श्री अंबाबाई मंदिरातही गणपती बाप्पा विराजमान झाले. तर सांगलीत श्री गणपती पंचायतन संस्थेचं गणपतीचं पारंपरिक वाद्यांच्या गजरात आगमन झालं. धाराशिव जिल्ह्यात श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात गणेश विहारामध्ये श्री गणेशाची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. नाशिकमध्ये 757 गावांमध्ये एक गाव एक गणपती उपक्रम राबवला जात आहे. बीडमध्येही 192 गावांनी तर धुळ्यात 36 गावांनी तर धाराशिव जिल्ह्यात 45 गावांमध्ये'एक गाव एक गणपती'उपक्रम राबवला गेला.

नागपूरमध्ये सिनियर भोसला पॅलेस इथल्या गणेशोत्सवाचं यंदा 298वं वर्ष असून नागपूरचे राजे मुधोजी भोसले यांच्या निवासस्थानी गणेश प्रतिष्ठापना करण्यात आली. रत्नागिरीतल्या कर्ला आंबेशेत गावात सलग 41 व्या वर्षीही 125 घरगुती गणपतींचं एकाच मिरवणुकीतून आगमन झालं. सिंधुदुर्ग जिल्ह्यात परंपरेनुसार बाप्पांच्या डोक्यावरची लाकडी माटवी विविध फळा फुलांनी सजवण्यात आली. नंदुरबारच्या श्रीमंत दादा गणपती आणि श्रीमंत बाबा गणपतींची मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात विधिवत स्थापना करण्यात आली. यवतमाळच्या उमरखेड इथे पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी लाल मातीच्या मूर्तींचं वितरण करण्यात आले.

पुण्याच्या वैभवशाली सार्वजनिक गणेशोत्सवालाही काल जल्लोषात सुरुवात झाली; ऐकूया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधिकडून...

***गणपती बाप्पा मोरयाचा गजर, ढोलताशांचा लयबद्ध ताल आणि मंगल सुरावटीने सजवलेले मंडप याचबरोबर मनातील उत्साहाने बाप्पासमोर नतमस्तक होत, भक्तीमय झालेला प्रत्येकजण आनंदून गेला होता. पुण्यातील मानाचे कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी, गुरुजी तालीम, तुळशीबाग आणि केसरीवाडा या मंडळांमध्ये वाजत गाजत मिरवणूक काढत गणरायाची स्थापना करण्यात आली. उत्सव काळात विविध गणेश मंडळ आणि सामाजिक संस्थांच्यावतीने समाजोपयोगी उपक्रम राबवले जातात. पुण्यातील नवग्रह मित्र मंडळाने गणेश भक्तीला समाजासेवेची जोड दिली आहे. बाप्पाला फुले***

*आणि इतर साहित्य वाहण्याऐवजी एक वही एक पेन या उपक्रम राबवला जातो. यामाध्यमातून दरवर्षी शेकडो विद्यार्थ्यांपर्यंत शैक्षणिक साहित्य पोहोचवलं जातं. आकाशवाणी बातम्यांसाठी मंजुषा गायधनी, पुणे.*

या वर्षी गणेश चतुर्थीबरोबरच काल हरतालिका तृतियादेखील भक्तिभावाने साजरी झाली. घरोघरी सुवासिनींनी हरतालकेची मनोभावे पूजा केली. दरम्यान आज दीड दिवसांच्या घरगुती गणपतीचं विसर्जन होणार आहे. यासाठी पुणे महापालिकेनं विसर्जन घाट, कृत्रिम हौद, मूर्ती संकलन केंद्र अशी सर्व यंत्रणा सज्ज ठेवली आहे.

**गणेश प्रतिष्ठापना**

मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या वर्षा या सरकारी निवासस्थानीही गणराज विराजमान झाले. परंपरेचं जतन आणि पर्यावरण संरक्षणाचा समतोल साधत उत्सव साजरा करण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी गणेशभक्तांना केलं.

लोकभवन इथे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली. दिल्लीत महाराष्ट्र सदनात ढोल ताशांच्या गजरात उपराष्ट्रपती सी. पी राधाकृष्णन यांच्या हस्ते विघ्नहर्त्याची पूजा आणि आरती करण्यात आली.

**गणेश दर्शन**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल मुख्यमंत्र्यांच्या मुंबईतल्या तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे इथल्या निवासस्थानी सहकुटुंब गणेशाचं दर्शन घेतलं. तसंच मुंबईतल्या लालबागच्या राजाचं दर्शनही त्यांनी घेतलं.

**हिंदी दिवस**

देशातल्या सर्व प्रादेशिक भाषांचा आदर राखत हिंदीला त्यांच्यामध्ये समन्वय साधणारा 'मध्यमणी' बनवूया असं आवाहन केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी काल नवी मुंबईत केलं. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या राजभाषा विभागाच्या वतीनं वाशीमध्ये आयोजित सहाव्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनाचं उद्घाटन शहा यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्राची संस्कृती ही बहुभाषिक असून महाराष्ट्रानं सर्व भाषकांना मोठ्या मनानं आपल्यात सामावून घेतलं आहे, असं शहा यावेळी म्हणाले. केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. 'हिंदी ही देशाला जोडणारी भाषा असून, सर्व भारतीय भाषांचा परस्पर सलोखा राखण्याचा संकल्प कऱण्याचं आवाहन' मुख्यमंत्र्यांनी यावेळी बोलताना केलं.

**समान नागरी कायदा**

राज्य सरकारनं समान नागरी कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीनं अहवाल सादर केल्यानंतर, राज्य सरकार त्याची लवकरात लवकर अंमलबजावणी करेल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. 2029 पर्यंत भाजप शासित 21 राज्यांमध्ये समान नागरी कायदा लागू कऱण्याचा मानस अमित शहा यांनी रविवारी मुंबई दौऱ्यात व्यक्त केला होता. त्यावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री बोलत होते.

**मराठा आरक्षण**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे काही मोजक्या सहकाऱ्यांसह आज मुंबईला रवाना होणार आहेत. अंतरवाली सराटी इथे वार्ताहरांशी बोलताना जरांगे यांनी ही माहिती दिली. मुंबईतील आझाद मैदानावर 19 सप्टेंबर रोजी उपोषण सुरू करण्याचा निर्णय कायम असल्याचंही ते म्हणाले.

**मराठा आरक्षण-प्रतिक्रिया**

दरम्यान, मराठा आरक्षणासंदर्भात, न्यायालयाकडे वर्ग असणाऱ्या काही बाबी वगळता आंदोलनकर्त्यांच्या बहुतांश मागण्या मान्य झाल्या असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संदर्भात प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. या परिस्थितीत उत्सव काळात आंदोलन करणं योग्य नसल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली.

**<u>बावनकुळे-प्रतिक्रिया</u>**

गणेशोत्सवाच्या काळात आंदोलनाचा मार्ग न स्वीकारता राज्याच्या विकासासाठी एकजुटीने राहावं असं आवाहन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल नागपुरात पत्रकारांशी बोलतांना केलं.

**<u>दिशा सॅलियन</u>**

दिशा सालियन मृत्यू प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागानं प्राथमिक चौकशी अहवाल दाखल करून घेतला आहे. दिवंगत अभिनेता सुशांत सिह राजपूत याची व्यवस्थापक असलेल्या दिशाचा 7 जून 2020 रोजी इमारतीवरून पडून मृत्यू झाला होता. यामध्ये तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, त्यांचे सुरक्षारक्षक, काही अभिनेते, पोलिस अधिकाऱ्यांचा उल्लेख आहे.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि अफगाणिस्थान यांच्यातला टी-20 क्रिकेट मालिकेतला दूसरा सामना आज नवी दिल्लीत खेळला जाणार आहे. तीन सामन्यांच्या मालिकेत भारत 1-0 नं आघाडीवर आहे.

**<u>निधन</u>**

राज्याचे माजी राज्यमंत्री आणि मावळचे माजी आमदार मदन बाफना यांचं काल पुण्यात अल्प आजारानं निधन झालं. ते 87 वर्षांचे होते. बाफना हे 1985 आणि 1990 मध्ये मावळमधून आमदारपदी निवडून आले होते. सन 1987 ते 1992 या काळात त्यांनी राज्य मंत्रिमंडळात महसूल, विधी आणि न्याय खात्याचे राज्यमंत्री म्हणून काम पाहिलं. बाफना यांच्या पार्थिवावर आज दुपारी वडगाव मावळ इथे अंत्यसंस्कार केले जातील.

**<u>हवामान</u>**

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी काल जोरदार पाऊस पडला. आजही कोकण आणि विदर्भात अनेक ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.